सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद.

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
उस्मानपुरा, औरंगाबाद-431005
**website: www.gpabad.ac.in**
E-mail: principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in
office.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

**सुचना**

जा.क्र.शातंनिऔ/विवि/२०२३/ 1582
दिनांक. 12 MAY 2023

**संदर्भ :- महाडीबीटी पोर्टलवरील सुचना**

उपरोक्त संदर्भीय सुचनेनुसार संस्थेतील सर्व विदयार्थ्यांना सुचित करण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०२२-२३** करिता **महाडीबीटी** पोर्टलवरील **राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ईबीसी) सवलत, मायनॉरिटी शिष्यवृत्ती व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना, एससी, एसटी, ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी शिष्यवृत्ती व फ्रीशिप मंजुरीचे** अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याची मुदतवाढ **दिनांक** २५/०५/२०२३ पर्यंत जाहीर करण्यात आली आहे. तरी ज्या पात्र विदयार्थ्यांनी अर्ज भरलेले नाही अशा पात्र विदयार्थ्यांनी दिलेल्या वाढीव मुदतीत अर्ज भरावे. जर पात्र विदयार्थी योजनेचा अर्ज भरण्यापासून वंचित राहिल्यास या बाबतची सर्वस्वी जबाबदारी विदयार्थ्यांवर राहील. तसेच **सन** २०२१-२२ च्या राहीलेल्या विदयार्थ्यांना पुनःछ अर्ज **(Re-Apply)** करण्याकरिता **दिनांक** २५/०५/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी राहीलेल्या विदयार्थ्यांनी अर्ज **(Re-Apply)** करावे.

तसेच सोबत जोडलेल्या यादीतील **राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ईबीसी) सवलत, मायनॉरिटी शिष्यवृत्ती व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना, एससी, एसटी, ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी शिष्यवृत्ती व फ्रीशिप** शिष्यवृत्तीचे अर्ज विद्यार्थ्यांनी भरलेले नाही किंवा ज्यांचे अर्ज परत **send back** आहे, अशा विद्यार्थ्यांनी तात्काळ अर्ज भरून विद्यार्थी विभागास जमा करावा, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद

**प्रतः- सर्व विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदरची सुचना सर्व विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणावी व पात्र विद्यार्थी शिष्यवृत्ती योजने पासुन वंचित राहणार नाही, यांची काळजी घ्यावी.**

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७

ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ :: संकेतस्थळ / पोस्ट /ई-मेलद्वारे** क्र.१८/तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२२-२३/२११
दिनांक : १२ /०८ / २०२२

प्रति,
सर्व संबंधीत संस्थाचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,
( मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था )
महाराष्ट्र राज्य.

विषय: - **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलद्वारे राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांच्या अंमलबजावणीसाठी संस्थांनी माहिती अद्ययावत करण्याबाबत...**

संदर्भ: १. संचालनालयाची सूचना क्र.१८/तंशिसं/टॉप-क्लास/२०२२-२३/२०६, दि. ०५ /०८/२०२२
२. संचालनालयाची सूचना क्र १८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/२०२२-२३/२०७, दि.०५ /०८/२०२२
३.संचालनालयाची सूचना क्र.१८/तंशिसं/टॉप क्लास/२०२२-२३/२०८, दि. ०५ /०८ /२०२२

केंद्र शासनाच्या एनएसपी [ National Scholarship Portal ( NSP ) संकेतस्थळ : www.scholarships.gov.in )] पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने राबविल्या जात असलेल्या खालील योजनांच्या महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलबजावणीसाठी तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई हे नोडल ऑफीस घोषित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | योजनेचे नाव | सविस्तर माहितीसाठी संकेतस्थळ | विभाग / मंत्रालय |
|---|---|---|---|
| १. | **गुणवत्ता नि साधन शिष्यवृत्ती योजना**<br>(Merit Cum Means Based Scholarship Scheme ) | अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी<br>( www.minorityaffairs.gov.in ) | अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार |
| २. | **टॉप क्लास शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना**<br>( Scholarship for Top Class Education for students with Disabilities ) | दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी<br>( www.disabilityaffairs.gov.in ) | सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार |
| ३. | **प्रगती शिष्यवृत्ती योजना ( पदविका / पदवी )**<br>[Pragati Scholarship Scheme ( Diploma / Degree )] | विद्यार्थीनींसाठी<br>( www.aicte-india.org ) | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, (AICTE) |
| ४. | **सक्षम शिष्यवृत्ती योजना ( पदविका /पदवी )**<br>[Saksham Scholarship Scheme ( Diploma / Degree )] | दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी<br>( www.aicte-india.org ) | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, (AICTE) |
| ५. | **स्वनाथ शिष्यवृत्ती योजना ( पदविका / पदवी )**<br>[Swanath Scholarship Scheme ( Diploma / Degree )] | • अनाथ विद्यार्थ्यांसाठी **किंवा**<br>• ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोविड-१९ ने मृत्यू पावले आहेत **किंवा**<br>• ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी<br>( www.aicte-india.org ) | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, (AICTE) |

उपरोक्त योजनेच्या लाभासाठी एनएसपी पोर्टलवर विद्यार्थ्यांकडून अर्ज भरण्याबाबत संबंधित संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

**सन २०२२-२३ साठी उपरोक्त योजनांच्या NSP पोर्टलवर अंमलबजावणीसाठी मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम ( पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ) चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांनी खाली दिलेल्या सुचनानुसार तात्काळ कार्यवाही करावी अन्यथा या कारणास्तव कोणताही पात्र विद्यार्थी NSP पोर्टलवर असलेल्या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुख यांची स्वत:ची राहील याची नोंद घ्यावी.**

**संस्थांनी** NSP पोर्टलवर Home Page -> Public Corner--> Search for Institutes on NSP अंतर्गत "Search Institute/School/ITI registered with NSP" **किंवा** "Search By AISHE/DISE/ITI(NCVT) Code in AISHE/DISE/ITI(NCVT) Code Master" पर्यायाचा वापर करुन व त्यानुसार संस्थेची माहिती भरुन एनएसपी पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या संस्थाच्या यादीमध्ये संस्थेच्या KYC status - Approved किंवा Not Approved आहे याबाबतची माहिती जाणून घ्यावी. संस्थेने KYC status - Approved किंवा KYC status - Not Approved नुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

## A. KYC status - Approved असलेल्या संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. **या पूर्वी एनएसपी पोर्टलवर लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन** Institute Nodal Officer ( INO ) व Head of Institute ( HOI ) **यांचे** Aadhaar Authentication **करुन घेतलेले आहे त्या संस्थांनी ,**

एनएसपी पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन एनएसपी पोर्टलवर दिलेल्या सूचनानुसार, Institute Profile अद्ययावत करावी (उदा. संस्थेमध्ये चालू असलेले अभ्यासक्रम व लागू असलेले शुल्काची रक्कम इ.) आणि,

२. **जर या पूर्वी एनएसपी पोर्टलवर लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन** Institute Nodal Officer ( INO ) / Head of Institute ( HOI ) **यांचे** Aadhaar Authentication **करुन घेतलेले आहे** परंतु **सध्या संस्थामध्ये कार्यरत नाही अशा संस्थांनी,**

कार्यरत असलेल्या Institute Nodal Officer (INO) / Head of Institute (HOI) यांचे Aadhaar क्रमांक एनएसपी पोर्टलवर अद्ययावत करुन Aadhaar Authentication करुन घ्यावे व एनएसपी पोर्टलवर दिलेल्या सूचनानुसार, Institute Profile अद्ययावत करावी (उदा. संस्थेमध्ये चालू असलेले अभ्यासक्रम व लागू असलेले शुल्काची रक्कम इ.)

**टीप :-** सध्या कार्यरत असलेल्या Institute Nodal Officer ( INO ) / Head of Institute ( HOI ) यांची माहीती अद्ययावत करतेवेळी प्राप्त होणारा OTP हा पूर्वी कार्यरत असलेल्या Institute Nodal Officer ( INO ) / Head of Institute ( HOI ) च्या **Authentication** झालेल्या **Aadhaar क्रमांकाशी संलग्नित असलेल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणार आहे.** संस्थेने संबंधितांकडून सदर OTP प्राप्त करुन घेऊन माहिती अद्ययावत करावी.

**जर, संस्थामध्ये पूर्वी कार्यरत असलेल्या** Institute Nodal Officer ( INO ) / Head of Institute ( HOI ) कडून OTP प्राप्त होत नसेल तर, संस्थांनी **ज्याचा पासवर्ड रिसेट करायचा आहे फक्त त्याचीच** माहिती ( INO किंवा HOI किंवा INO व HOI ) संस्थेच्या लेटरहेडवर पूर्वी कार्यरत असलेल्या Institute Nodal Officer ( INO ) / Head of Institute ( HOI ) कडून OTP प्राप्त न होण्याचे कारण नमूद करुन, पत्रासोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये (Annex - I) माहिती भरुन AISHE code च्या Certificate छायांकीत प्रतीसह ***संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१*** या पत्यावर पाठवून **प्राप्त करुन घ्यावे..**

३. **ज्या संस्थांनी या पूर्वी एनएसपी पोर्टलवर लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन** Institute Nodal Officer ( INO ) /Head of Institute ( HOI ) च्या **Aadhaar Authentication करुन घेतलेले नाही** अशा संस्थांनी,

Institute Nodal Officer ( INO ) /Head of Institute ( HOI ) च्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Edit Profile मध्ये जाऊन दिलेल्या सूचनानुसार Institute Nodal Officer ( INO ) /Head of Institute ( HOI ) यांचे आधार क्रमांक, आधार कार्डशी संलग्न असलेला मोबाईल क्रमांक, आधार कार्डवर असलेले नाव व आधार कार्डवर असलेली माहिती ( Gender, Date of Birth etc. ) जशीच्या तशी भरुन Aadhaar Authentication तात्काळ करुन घ्यावे.

**टीप :-** एनएसपी पोर्टलवर संस्थेकडून जर Institute Nodal Officer ( INO ) /Head of Institute ( HOI ) यांचे Dr./Mr./Mrs./Ms. असे prefix सह नाव Registered करण्यात आलेले आहे व आधार कार्डवर तसे prefix सह नाव नमूद नसेल तर एनएसपी पोर्टलद्वारे Aadhaar Authentication करुन घेतेवेळी Aadhaar Authentication Successful **होत नाही.** त्या कारणाने संस्थांनी एनएसपी पोर्टलवर Aadhaar Authentication साठी Aadhaar Card वर जसे नाव आहे तसेच नाव Register करावे. तरीदेखील,

संस्थांना Institute Nodal Officer ( INO ) /Head of Institute ( HOI ) चे एनएसपी पोर्टलवर Aadhaar Authentication करताना अडचण आली व प्रक्रिया पूर्ण करता आली नाही तर संस्थेच्या लेटरहेडवर Institute Nodal Officer ( INO ) /Head of Institute ( HOI ) यांचे Aadhaar Authentication करतेवेळी येणारी अडचण नमूद करुन पत्रासोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये ( Annex – I ) माहिती भरुन अद्ययावत असलेल्या AISHE code **च्या Certificate छायांकीत प्रतीसह** ***संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१*** या पत्यावर तात्काळ पाठवून Aadhaar Authentication करुन घ्यावे.

## B. KYC status – Not Approved असलेल्या संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम ( पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ) चालविणाऱ्या व All India Survey on Higher Education Code (AISHE code) असलेल्या सर्व संबंधित संस्थांनी,

१. NSP पोर्टलवर Home Page -> Institute Corner->Apply for KYC-> Institute KYC Registration Form मध्ये To Fill Registration Form अंतर्गत दिलेल्या सूचनानुसार Institute KYC Registration Form भरावा.

२. NSP पोर्टलवर Institute KYC Registration Form भरुन जमा केल्यानंतर, पोर्टलवर उपलब्ध झालेल्या Print Optionचा वापर करुन, भरलेल्या Institute KYC Registration Form ची Print काढून त्यावर संस्थेचा स्टॅम्प सह Institute Nodal Officer ( INO ) /Head of Institute ( HOI ) यांनी स्वाक्षरी करावी.

३. Institute KYC Registration Form मंजूरीसाठी, संस्थेच्या लेटरहेडवर Institute KYC Registration Form **यापूर्वी** मंजूर करुन घेतला नसल्याबाबतचे कारण नमूद करावी व पत्रासोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये ( Annex – I ) माहिती भरावी व

४. संस्थेने उपरोक्त अनुक्रमांक २ नुसार स्वाक्षरी असलेले Institute KYC Registration Form व उपरोक्त अनुक्रमांक **३ नुसार संस्थेचे पत्र,** ,अद्ययावत असलेल्या AISHE code **च्या Certificate छायांकीत प्रतीसह** ***संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१*** या पत्यावर तात्काळ पाठवून **मंजूर करुन घेण्यात यावे.**

सदर Institute KYC Registration Form मंजूर झाल्यानंतर लॉगीन आयडी व पासवर्ड एनएसपी पोर्टलद्वारे संबंधितांच्या आधार क्रमांकाशी संलग्नित मोबाईल क्रमांकावर प्राप्त होतो. त्यांनंतर संस्थांनी प्राप्त झालेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन एनएसपी पोर्टलवर दिलेल्या सूचनानुसार, Institute Profile अद्ययावत करावी (उदा. संस्थेमध्ये चालू असलेले अभ्यासक्रम व लागू असलेले शुल्काची रक्कम इ.)

सही /-
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

**प्रत - यांना माहितीसाठी सविनय सादर.**

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई.
२. मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई.
३. मा. आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र शासन, ३ चर्च रोड पुणे -४११ ००१.

**प्रत - यांना माहितीसाठी व त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व त्यांच्या अधिनस्त मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांना सूचना देऊन कार्यवाही पूर्ण करुन घेण्याबाबत.**

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर **(वरील सर्व योजनांसाठी)**
२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ४०० ००१. (केंद्र शासनाच्या **गुणवत्ता नि साधन शिष्यवृत्ती योजना** साठी)
३. मा. संचालक, आयुष संचालनालय, चौथा माळा, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ४०० ००१. (केंद्र शासनाच्या **गुणवत्ता नि साधन शिष्यवृत्ती योजना** साठी)
४. मा. संचालक, इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकाउन्टस ऑफ इंडिया, आयसीएआय टॉवर, प्लॉट नं. सी-४०, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा ईस्ट, मुंबई - ४०० ०५१. (केंद्र शासनाच्या **गुणवत्ता नि साधन शिष्यवृत्ती योजना** साठी)
५. मा. संचालक, कला संचालनालय, सर जे जे स्कुल ऑफ आर्ट कॅम्पस, डॉ. डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई-० १.
६. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१.
७. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे - ४११ ०३७.
८. मा. संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, १७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-०१.

**प्रत - यांना माहिती व कार्यवाहीसाठी.** (केंद्र शासनाच्या **गुणवत्ता नि साधन शिष्यवृत्ती योजना** साठी)

1. Head of the Institute, Indian Institution of Technology (IIT), Main Gate Rd, IIT Area, Powai, Mumbai, Maharashtra 400076.
2. Head of the Institute, National Institute of Industrial Engineering, Vihar Lake, P.O. NITIE, Mumbai – 400 078.
3. Head of the Institute, National Institute of Fashion Technology, Plot no. 15, Service Road, Sector 4, Kharghar, Navi Mumbai, Maharashtra 410210.
4. Head of the Institute, Visvesvaraya National Institute of Technology, S Ambazari Rd, Ambazari, Nagpur, Maharashtra 440010.

प्रत - खाली दिलेल्या यादीतील संस्थांना माहिती व कार्यवाहीसाठी. ( केंद्र शासनाच्या टॉप क्लास शिष्यवृत्ती योजना साठी )

| List of Notified Institutes of Excellence in Education of Maharashtra State for Top Class Education for Students with Disabilities scheme ( For details refer the Guideline of scheme on NSP Portal ) | | | |
|---|---|---|---|
| **Sr.No.** | **Name of Institute** | **Location** | District |
| 1 | Indian Institute of Technology, Bombay. | Powai, Mumbai. - 400 076. Maharashtra. | Mumbai Suburban |
| 2 | Visvesvaraya National Institute of Technology, Nagpur | South Ambazari Road, Nagpur- 440010. | Nagpur |
| 3 | Indian Institute of Information & Technology, Pune. | Village Nanoli, Tehsil-Mawa, Dist- Pune. | Pune |
| 4 | National Institute of Industrial Engineering, Mumbai. | Vihar Lake Marg, Near The Residence Hotel, Aarey Powai Road,Goregaon, Mumbai-400087 Maharashtra. | Mumbai Suburban |
| 5 | Indian Institute of Management, Nagpur. | South Ambazari Road, Ambazari, Nagpur- 440010. Maharashtra<br><br>VNIT Campus, South Ambazari Road, Ambazari, Nagpur- 440010. Maharashtra | Nagpur |
| 6 | National Institute of Industrial Engineering( NITIE), Mumbai. | Vihar Lake Marg, Near The Residence Hotel, Aarey Powai Road, Goregaon, Mumbai-400087 Maharashtra. | Mumbai Suburban |
| 7 | SYMBIOSIS Institute of Business Management, Pune. | Senapati Bapat Road, Pune - 411 004. | Pune |
| 8 | Narsee Monjee Institute of Management Studies, Mumbai. | V.L. Mehta Road, Vile Parle (W), Mumbai-400056. | Mumbai Suburban |
| 9 | Bharati Vidyapeeth, Pune | LBS Road, 13 Sadashiv Peth, Next to Alka Talkies, Pune, 411030 Maharashtra. | Pune |
| 10 | S.P. Jain Institute of Research & Mgt. Mumbai. | Inside Bhavans College Campus, Munshi Nagar, Dadabhai Road, Andheri West, Mumbai-400058,Maharashtra. | Mumbai Suburban |
| 11 | Jamnalal Bajaj Institute, Mumbai. | Jamnalal Bajaj Institute, Mumbai.<br>164, Backbay Reclamation, H.T. Parekh Marg, DN House, Church Gate, Mumbai- 400020 Maharashtra | Mumbai City |
| 12 | ILS Law College, Pune | Law College Road, Pune- 411004 | Pune |
| 13 | SYMBIOSIS Law College, Pune. | Senapati Bapat Road,Wadervadi, Pune. | Pune |
| 14 | Grant Govt. Medical College, Mumbai. | Sir J J Hospital, Byculla, Mumbai-400008. | Mumbai City |
| 15 | King Edward Memorial Hospital, Mumbai. | Acharya Donde Marg, Parel, Mumbai- 400012. | Mumbai City |
| 16 | Padmashree Dr. D.Y. Patil Vidyapeeth, Nerul, Mumbai. | Sector 7, Nerul, Navi Mumbai – 400706 | Thane |
| 17 | Central Institute for Research of Cotton Technology, Mumbai | Adenwala Road, Matunga, Mumbai-400019. | Mumbai City |
| 18 | National Institute of Fashion Technology, Mumbai. | NIFT Campus Plot No. 15, Sector - 4, Kharghar, Navi Mumbai - 410 210. | Raigad |

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | Institute of Hotel Management, Catering Tech. & Applied Nutrition, Mumbai. | Veer Sawarkar Marg, Dadar (W) Mumbai- 400028. | Mumbai City |
| 20 | B.V. Institute of Hotel Management & Catering Technology, Mumbai | Sector-8, CBD, Navi Mumbai- 400614. | Thane |
| 21 | B.V. ( Bharati Vidyapeeth's ) Instt. Of Hotel Mgmt. & Catering Tech. , Pune. | Katraj - Dhanakavdi, Pune - 411 043. | Pune |
| 22 | All India Shri Shivaji Memorial Institute of Hotel Mgmt & Catering Tech., Pune. | 55/56, Shivaji Nagar, Pune.- 411 005 | Pune |
| 23 | Ali Yavar Jung Nationla Institute for the Hearing Handicapped, Mumbai. | Kishan Chand Marg, Bandra(West), Mumbai- 400050. | Mumbai Suburban |
| 24 | Indian Institute of Science Education & Research, Pune. | Dr Homi Bhabha Rd, Ward No. 8, NCL Colony, Pashan, Pune- 411008. | Pune |
| 25 | Tata Institute of Social Science, Mumbai. | PO Box 8313, Deonar, Mumbai - 400088. | Mumbai Suburban |
| 26 | Film & Television Institute of India, Pune. | Law College Road, Pune- 411004 | Pune |

## Annex -I

Information of Head of Institute ( HOI) and Institute Nodal Officer ( INO ) for approving Institute KYC Registration Form

OR

For Resetting the Password of Head of Institute ( HOI) /Institute Nodal Officer ( INO ) of National Scholarship Portal

Note:- For resetting password fill information of concerned only whose password is to be reset.

Institute Name as per AISHE (All India Survey on Higher Education) Code _ _ _ _ _

Institute District - _ _ _ _ _

Affiliated Board / University - _ _ _ _ _

DISE / AISHE (All India Survey on Higher Education) Code (ex. C-XXXXX) - _ _ _ _ _

DTE Code ( Only for that Inst. which comes under DTE ) - _ _ _ _ _

| Institute KYC Registration Form No. (Ex.MHXXX XXXXX) | Detail of Head of Institute ( HOI ) | | | | | Detail of Institute Nodal Officer ( INO ) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Aadhaar Number | Name as on Aadhaar Card | Date of Birth (DD/MM/ YYYY) | Gender | Mobile No.linked with Aadhaar Card | Aadhaar Number | Name as on Aadhaar Card | Date of Birth (DD/MM /YYYY) | Gender | Mobile No.linked with Aadhaar Card |
| | | | | | | | | | | |

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७

ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**संकेतस्थळ /रजिस्टर एडी/ई-मेल द्वारे** **क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/२०२२-२३/२०७**
दिनांक : ०५ / ०८ / २०२२

प्रति,
सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक,
(अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था)
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या प्रगती , सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांची सन २०२२-२३ साठीच्या अंमलबजावणीबाबत....**

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र File No. ४९-१/५०-१ AICTE/StDC/ Pragati & Saksham/२०२२-२३ -दि. १९.०७.२०२२

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या **प्रगती , सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांच्या** महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता **तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर तिन्ही योजनांची माहिती खालीलप्रमाणे,

## अ) प्रगती शिष्यवृत्ती योजना ::

[ AICTE-Pragati Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका, पदवी) शिकणाऱ्या **विद्यार्थीनीं साठी** प्रगती शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखापर्यंत** असावे व एका कुटूंबातील **केवळ दोन मुलींना** सदर योजना लागू राहील.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- **नविन संच / कोटा ( Quota ) :-**

| राज्य | अ.क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | ६२४ |
| | २ | पदवी | ५५३ |

- **शिष्यवृत्ती रक्कम :-**

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | **रु. ५०,०००/- प्रति वर्ष** |

## ब ) सक्षम शिष्यवृत्ती योजना ::

[ AICTE-Saksham Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मंजूरी प्राप्त संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **विशेष दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी** सक्षम शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८.०० लाखापर्यंत** व **दिव्यांगाचे प्रमाण ४०% किंवा त्यापेक्षा अधिक असावे** असे निश्चित करण्यात आलेले आहे.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- **नविन संच / कोटा ( Quota ) :-**

| राज्य | अ.क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | सर्व पात्र |
| | २ | पदवी | सर्व पात्र |

- **शिष्यवृत्ती रक्कम :-**

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| ब | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | **रु. ५०,०००/- प्रति वर्ष** |

## क ) स्वनाथ शिष्यवृत्ती योजना :

[ AICTE-Swanath Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्रेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका,पदवी) शिकणाऱ्या **अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोव्हिड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा** विद्यार्थ्यांसाठी **स्वनाथ शिष्यवृत्ती** योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे सर्व स्त्रोतांमार्फत मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखापर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे.

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून संपूर्ण देशासाठी खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- **नविन संच/कोटा** (Quota)

| अ क्र. | अभ्यासक्रम | संपूर्ण देशासाठी संच संख्या |
|---|---|---|
| १ | पदविका | १००० |
| २ | पदवी | १००० |

- **शिष्यवृत्ती रक्कम**

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम** ( Lump sum Amount ) |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | रु.५०,०००/- प्रति वर्ष |

उपरोक्त तिन्ही योजनेची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे संकेतस्थळावर ( संकेतस्थळ - www.aicte-india.org ) / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे

सदर योजनेची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात. **सन २०२२-२३ करिता** सदर योजनेच्या लाभासाठी ,**सन २०२२-२३ मध्ये प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षात नव्याने प्रवेशित** विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) अर्ज व **सन २०२१-२२ मध्ये शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नूतनीकरण** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या करावे ( अर्ज करण्यापूर्वी मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी NSP पोर्टलवर सदर योजनेसाठी उपलब्ध User Manual / Guideline/FAQ चा वापर करावा.)

तसेच, संस्थांनी NSP पोर्टलच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करावी.

| विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे वेळापत्रक :: शै. वर्ष २०२२-२३ | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यवाही** | **अंतिम दिनांक** |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ ऑक्टोबर, २०२२ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जाची तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करणे | १५ नोव्हेंबर, २०२२ |
| **टीप :: केंद्र शासनाकडून वेळापत्रकात काही बदल झाल्यास सदर बदल एनएसपी पोर्टलवर ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.** | | |

**महत्त्वाची सूचना-**

१. संस्थांनी एनएसपी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करावी.

२. संस्थांनी उपरोक्त योजनेबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.
३. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी.
४. संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज जर तपासणीच्या अंतिम मुदतीनंतर संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास **किंवा**
५. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन - दोन शिष्यवृत्ती योजनांचा ( केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा ) लाभ प्राप्त करुन घेतल्यास **किंवा**
६. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास **किंवा**
७. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास तर याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

सही/-
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

प्रत -.

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई. ( लक्षवेध - श्री. नितिन घिरटकर, कक्ष अधिकारी ) यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा.अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७वा मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई.( लक्षवेध -श्री. कदम. कक्ष अधिकारी ) यांना माहितीसाठी सविनय सादर.
३. मा. आयुक्त, समाज कल्याण विभाग आयुक्तालय,३ चर्च पथ, पोलिस आयुक्त कार्यालयाजवळ,आगरकर नगर, पुणे-४११ ००१.(Email id-comm.socwelfare@maharashtra.gov.in)
४. मा. आयुक्त, अदिवासी विकास आयुक्तालय, आदिवासी विकास भवन, १ ला मजला , जुना आग्रा रोड, गडकरी चौक, नाशिक-४२२ ००२. .(Email id-ctd.nsk-mh@gov.in)
५. मा. संचालक, इतर मागास बहूजन कल्याण विभाग संचालनालय,३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, ३ , बी. जे. मेडिकल रोड, पुणे — ४११ ००१. .(Email id-dvjntobcsbcwpune@hmail.com)
६. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१ यांना माहितीसाठी सविनय सादर. .(Email id-schol.dhepune@gov.in)
७. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहितीसाठी व सदर योजनाची अंमलबजावणीबाबत त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व त्यांच्या अधिनस्त मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांना जाहिर वेळापत्रकानुसार न चुकता कार्यवाही पूर्ण करुन घेण्यासाठी. .(Email id-rooffice@dtemaharashtra.gov.in)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://www.dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**<u>प्रवेशासंबंधी महत्वाची सूचना</u>**

क्रमांक: १०/एडीम/प्रमाणपत्रे/२०२३/२७८ दिनांक : 6 APR 2023

**शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागणारी आवश्यक प्रमाणपत्रे**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभ्यासक्रम, प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. औषधनिर्माणशास्त्र, एच.एम.सी.टी., सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रम तसेच प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी, प्रथम वर्ष फार्म.डी., वास्तुशास्त्र, बी.प्लॅनिंग, बी.डिझाइन पदवी अभ्यासक्रम (Under Graduate) आणि प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक., एम.फार्म., फार्म.डी.(PostBaccalaureate), एम.आर्किटेक्चर, एम.प्लॅनिंग, एम.एचएमसीटी, एमबीए/एमएमएस, एमसीए हे पदव्युत्तर पदवी (Post Graduate) या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून करण्यात येतात. त्यासाठी अर्ज करतांना संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या आवश्यक त्या प्रकरणी लागू असणारी खालील प्रमाणपत्रे सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घेऊन ती तयार ठेवण्याबाबत प्रवेशोच्छुक उमेदवारांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

१) <u>जात / जमात प्रमाणपत्र ( Caste / Tribe Certificate )</u> (महाराष्ट्रातील सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले )

२) <u>जात / जमात वैधता प्रमाणपत्र (Caste / Tribe Validity Certificate )</u> (महाराष्ट्रातील सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले ).

टिप :

अ) इ.१० वी व १२ वी नंतरच्या पदविका प्रवेशासाठी जात/जमात वैधता प्रमाणपत्र आवश्यक नाही. (मात्र प्रथम वर्ष पदविका किंवा द्वितीय वर्षातील पदविका अभ्यासक्रमाच्या राखीव जागेवर प्रवेश मिळालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने प्रवेश मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत जात/जमात प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी संबंधित जात / जमात पडताळणी समितीकडे योग्य भरलेला अर्ज सादर करावा लागेल.)

ब) पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या मागासवर्गीयांसाठीच्या राखीव जागेवर प्रवेशासाठी मागासवर्गीय उमेदवाराने जात/जमात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३) अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय उमेदवारांसाठी दिनांक ३१ मार्च २०२४ पर्यंत वैध असलेले <u>नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र (Non- Creamy Layer Certificate).</u> राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांचा अधिवास महाराष्ट्र राज्यात असला तरी महाराष्ट्र राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या आरक्षणाचे धोरण त्यांना लागू नाही.

४) <u>राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र (Nationality Certificate)</u> व <u>अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)</u> - प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार.

५) <u>उत्पन्नाचे प्रमाणपत्र (Income Certificate)</u> - TFWS योजनेअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले .

६) <u>आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रवर्गासाठी (EWS) प्रमाणपत्र :</u> महाराष्ट्र राज्याच्या शासन निर्णयास अनुसरून विहीत केलेल्या प्रपत्रात सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

७) <u>दिव्यांगाबाबतचे प्रमाणपत्र (Person with Disability)</u> - आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले.

८) सैन्य दलातील (Defence) संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांच्या प्रवेशासाठी माहिती पुस्तिकेत दिलेले सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

९) आधार क्रमांक व संलग्नित बँक खाते : शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती इ. योजनांची रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक.

<u>इशारा</u> : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये काही उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही प्रमाणपत्रे जसे जात / जमात प्रमाणपत्रे / जात वैधता प्रमाणपत्रे /अपंगत्वाचे प्रमाणपत्र / नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्रे ही,सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त करून न घेता बनावट प्रकारची प्रमाणपत्रे सादर केल्याचे पडताळणीअंती आढळून आले होते, अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करून त्यांचेविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. प्रवेशोच्छुक उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सक्षम प्राधिकाऱ्यांकडूनच प्रमाणपत्रे प्राप्त करून घ्यावीत. बनावट अथवा खोटी प्रमाणपत्रे प्रवेशासाठी सादर केल्याचे आढळल्यास अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करून त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

वेगवेगळया वर्गवारी अंतर्गत प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या प्रमाणपत्रांची तपशीलवार माहिती प्रवेश पुस्तिकेत अंतर्भुत असते. त्याचा तपशील संचालनालयाच्या https://www.dte.maharashtra.gov.in व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या https://cetcell.mahacet.org या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

**( डॉ. विनोद मोहितकर )**
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीसाठी सादर

१. मा. प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
२. मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई
३. मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी :

१. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर- त्यांना कळविण्यात येते की, वरील सूचना आपल्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावी. तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना याबाबत कळविण्यात यावे.
२. कार्यासन क्र.२अ, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी.
३. कार्यासन क्रमांक ३ यांना माहितीसाठी व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

Hc

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ २७०
दिनांक :- ०१/ ११ /२०२२

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्याबाबत..**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/२२७ दि.२४/०८/२०२२
२. महाआयटी यांचा दि. २२/०९/२०२२ रोजी ईमेलद्वारे प्राप्त संदेश.
३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि. क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४/दि.०७/१०/२०१७
४. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/२४४ दि.२९/०९/२०२२

उपरोक्त विषयान्वे सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वे त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, योजनांबाबतची माहिती संस्थांनी संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्याबाबत व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून देण्याबाबत कळविण्यात आले होते. तरी देखील असे निदर्शनास आले कि, काही संस्थाकडुन शासनाच्या योजने बाबतची माहीती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्यात आली नाही व विदयार्थ्यांना देखील योजनाबाबतची माहीती देण्यात येत नाही.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना पुनश्च कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, **तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्या खालील योजनांबाबतची माहिती ( प्रत्येक योजनाची माहीती सोबत जोडलेली आहे )** संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर तत्काळ लावण्याबाबत व प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती Orientation / Induction Programme व्दारे निदर्शनास आणून देण्याबाबत सुचना देण्यात यावी.

अ ) महाराष्ट्र शासनाच्या :

१. उच्च व तंत्रशिक्षण विभागाची राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना:
२. उच्च व तंत्रशिक्षण विभागाची डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना:
३. अल्पसंख्यांक विकास विभागाची उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना:

ब) केंद्र शासनाच्या :

१. अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती योजना (Merit-Cum-Means) :
२. सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय यांची दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना:
३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांची विद्यार्थीनींसाठी प्रगती शिष्यवृत्ती योजना ( पदविका / पदवी अभ्यासक्रमासाठी ) :
४. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांची दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी सक्षम शिष्यवृत्ती योजना ( पदविका / पदवी अभ्यासक्रमासाठी ):
५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांची विद्यार्थ्यांसाठी स्वनाथ शिष्यवृत्ती योजना ( पदविका / पदवी अभ्यासक्रमासाठी ):

तसेच सस्थांनी पात्र विदयार्थ्यांना योजनेच्या लाभासाठीचे अर्ज भरण्यासाठी अवश्यक ते सहकार्य करावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही. तसेव ज्या संस्था दर्शनी भागातील सूचना फलकावर योजनाबद्ददलची माहीती लावणार नाही व पात्र विदयार्थ्यांना अर्ज भरण्यामध्ये सहकार्य करणार नाही त्या संस्थावर कार्यवाही करण्यात येइल असे देखील सुचित करण्यात यावे.

तसेच विभागीय कार्यालयांनी आपल्या अधिनस्त असलेल्या काही संस्थांना वेळोवेळी भेट देउन संस्थेने दर्शनी भागातील सूचना फलकावर योजनाबद्ददलची माहीती लावली आहे किंवा कसे याबाबत शाहनिशा करुन त्याबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करावे.

सोबत — वरील प्रत्येक योजनाची माहीती सोबत जोडली आहे

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

## तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना : 2022-23

### महाराष्ट्र शासनाची योजना :-

| अ.क्र. | विभाग | योजना | कोणत्या विद्यार्थ्यांना लागू |
|---|---|---|---|
| १ | उच्च व तंत्रशिक्षण विभागाची | **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना** - (पदविका,पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी) | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी- |
| २ | उच्च व तंत्रशिक्षण विभागाची | **डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना** - (पदविका,पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी) | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (व्यवस्थापन कोटयातील / संस्था स्तरांवरील प्रवेश वगळून) प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्प-भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी - |
| ३ | अल्पसंख्यांक विकास विभाग | **तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना** - (पदविका,पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी) | राज्यातील मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन आणि ज्यू या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी - |
| | | | |
| | | | |
| ■ पोर्टल | सदर योजना शासनाच्या महाडीबीटी पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - mahadbtmahait.gov.in) राबविण्यात येते. | | |
| ■ लाभ वितरणाची पध्दत | सदर योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते. | | |

### केंद्र शासनाची योजना :-

| अ.क्र. | विभाग | योजना | कोणत्या विद्यार्थ्यांना लागू |
|---|---|---|---|
| 1 | अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय | **गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती योजना** (Merit-Cum-Means) - (पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी) | राज्यातील मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी आणि जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी - |
| 2 | सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय | **टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना** - उच्च शिक्षण (पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी) | दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी - |
| ३ | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद | **प्रगती शिष्यवृत्ती योजना** - (पदविका / पदवी अभ्यासक्रमासाठी) | विद्यार्थीनींसाठी - |
| ४ | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद | **सक्षम शिष्यवृत्ती योजना** (पदविका / पदवी अभ्यासक्रमासाठी) | दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी - |
| ५ | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद | **स्वनाथ शिष्यवृत्ती योजना** - (तांत्रिक व व्यावसायिक पदविका /पदवी अभ्यासक्रमासाठी) | • अनाथ किंवा<br>• ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोविड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा<br>• ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी - |
| | सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. | | |
| | सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येते. | | |

## ❖ तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती

### १. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठासह), विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये / तंत्रनिकेतनामध्ये सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिका-यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळून ) प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी **"शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना "** सन २००६-०७ पासुन लागू केली. सन २०१७-१८ मध्ये योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी या योजनेचे नामकरण **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** ( Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulk Shishyavrutti Yojna ) असे करण्यात आले. सदर योजनेकरीता कुटुंबाचे **वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखा पर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे.

- **शिष्यवृत्ती रक्कम -**

सदर योजनेंतर्गत विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के** इतका लाभ ( दोन हप्त्यांमध्ये, पहीला हप्ता हा ऑक्टोबर महीन्याच्या पहील्या आठवडया पर्यंत व उर्वरित दुसरा हप्ता फेब्रुवारी अखेरपर्यंत ) देण्यात येतो

सदर योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना (त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये)/ संस्थाना डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- **वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-**

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या **आपले सरकार महाडिबीटी पोर्टल / AAPLE SARKAR MAHADBT PORTAL (संकेतस्थळ -** mahadbtmahait.gov.in ) वर देण्यात आलेल्या **युजर मॅन्युअल** चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टल वर दिलेल्या सुचनांचे पालन करुन **अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत न थांबता** संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावे.

२) ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्नीत नाहीत त्यांनी जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्न करुन घ्यावे.

## २. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून ) मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे ( व्यवस्थापन कोटयातील / संस्था स्तरांवरील प्रवेश वगळून ) प्रवेशित **ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्प-भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील** आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना"** ( Dr. Panjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Yojna ) लागू केली आहे.. सदर निर्वाहभत्ता योजना सन २०१६-१७ पासुन लागू केली आहे.

- निर्वाहभत्याची रक्कम खालील प्रमाणे -

| अ. क्र. | प्रकार | प्रवेशित अभ्यासक्रमाच्या संस्थेचे ठिकाण | वार्षिक वसतिगृह निर्वाह भत्याची एकुण रक्कम (शैक्षणिक वर्षातील १० महीन्या करिता) | राज्याच्या प्रत्येक जिल्हया-साठीचा संच (Quota) |
|---|---|---|---|---|
| १ | ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत. | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. ३०,०००/- | सर्व पात्र विद्यार्थी |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. २०,०००/- | |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा - **१ लाख पर्यंत**) | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. १०,०००/- | सर्व पात्र विद्यार्थी |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. ८,०००/- | |
| ३ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा - **१ लाखापुढे ते ८ लाख पर्यंत**) | ( मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. १०,०००/- | ५०० पर्यंत मर्यादित संच (३३ टक्के महिलां-करिता राखीव व अभ्यासक्रम निहाय गुणवत्ते नुसार) |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. ८,०००/- | |

सदर योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- **वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-**

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या **आपले सरकार महाडिबीटी पोर्टल / AAPLE SARKAR MAHADBT PORTAL (संकेतस्थळ - mahadbtmahait.gov.in )** वर देण्यात आलेल्या **युजर मॅन्युअल** चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टल वर दिलेल्या सुचनांचे पालन करुन **अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत न थांबता** संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावे.

२) ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्नीत नाहीत त्यांनी जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्न करुन घ्यावे.

३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना (भाग - १ वैद्यकिय अभ्यासक्रम वगळून ) :-२०२२-२३

अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील **मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन आणि ज्यू** या अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गुणवत्ताधारक व तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण ( पदविका, पदवी व पदव्युत्तर ) घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना सन २००८-०९ पासून लागू करण्यात आली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित )** रुपये ८.०० लाखा पर्यंत निश्चित करण्यात आलेले आहे. सदर योजनेकरीता विदयार्थ्यांने **माध्यमिक शालांत परिक्षा ( एस एस सी ) महाराष्ट्र राज्यातुन** उत्तीर्ण केलेली असावी.

- शिष्यवृत्ती रक्कम -

सदर योजनेंतर्गत नविन शिष्यवृत्ती व नूतनीकरणासाठी आलेल्या पात्र अल्पसंख्यांक विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे **प्रत्यक्ष वार्षिक शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क किंवा रुपये ५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती** म्हणून देण्यात येते. (सन २०२२-२३ पासुन शिष्यवृत्तीची रक्कम रु. २५,०००/- ऐवजी रु.५०,०००/- करण्यात आली आहे)

सदर योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- **वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-**

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या **आपले सरकार महाडिबीटी पोर्टल / AAPLE SARKAR MAHADBT PORTAL (संकेतस्थळ - mahadbtmahait.gov.in** ) वर देण्यात आलेल्या **युजर मॅन्युअल** चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टल वर दिलेल्या सुचनांचे पालन करुन **अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत न थांबता** संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावे.

२) ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्नीत नाहीत त्यांनी जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्न करुन घ्यावे.

## ४. गुणवत्ता – नि – साधन शिष्यवृत्ती योजना ( Merit-Cum-Means ) :-

अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली तर्फे अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता -नि - साधन शिष्यवृत्ती योजना सन २००७-०८ पासून सुरू केलेली आहे. सदर योजना **मुस्लिम , बौद्ध, ख्रिश्चन, शीख , पारशी आणि जैन** या अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये (पदवी व पदव्युत्तर ) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता लागू करण्यात आलेली आहे.सदर योजनेकरीता कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ). **रुपये २.५० लाखा पर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे. सदर योजनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे.

- **शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) -**

| धर्मनिहाय नविन ( Fresh ) शिष्यववृत्तीचा संच/कोटा | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| धर्म | मुस्लीम | बौध्द | ख्रिश्चन | शिख | पारशी | जैन | **एकूण** |
| **विदयार्थी संख्या** | ३३२८ | १६७६ | २७७ | ५७ | १२ | ३५९ | ५७०९ |

- **शिष्यवृत्ती रक्कम -**

सदर योजनेंतर्गत नविन शिष्यवृत्ती व नूतनीकरणासाठी आलेल्या पात्र विद्यार्थ्यांला खालील प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

| **Sr.No.** | **Type of Financial Assistance** | **Rate for Hostler** | **Rate for Day Scholar** |
|---|---|---|---|
| 1. | Maintenance Allowance (For 10 months only) | Rs.10,000/-per annum ( Rs.1000 p.m.) | Rs.5,000/- per annum. ( Rs.500 p.m.) |
| 2. | Course Fee* | Rs.20,000/- per annum or Actual whichever is less | Rs.20,000/- per annum or Actual whichever is less |
| **Total** | | **Rs.30,000/-** | **Rs.25,000/-** |
| *** Full course fee will be reimbursed for eligible institutions listed at Annexure-III .** | | | |

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येते. उपरोक्त योजनांची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाच्या संकेतस्थळ www.minorityaffairs.gov.in) / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सदर योजनेच्या लाभासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) **व मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नुतनीकरणासाठी** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

५. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना ( Scholarship For Top Class Education for Students with Disabilities ) :-

सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली तर्फे दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग यांचेमार्फत सन २०१५-१६ पासून दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण ( पदवी व पदव्युत्तर ) घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता **दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना** ( Scholarship For Top Class Education for Students with Disabilities ) ही शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आलेली आहे.सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ६.०० लाखा पर्यंत व दिव्यांगाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा अधिक** असावे असे निश्चित करण्यात आलेले आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा संच निर्धारीत करण्यात आला आहे. सदर योजनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे..

- शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) -

| अ.क्र. | राज्य | नविन ( Fresh ) संच/कोटा (Quota) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ पासुन.. |
| १ | महाराष्ट्र | १६ | १६ | १६ | ३१ |

- **शिष्यवृत्ती रक्कम** -

सदर योजनेंतर्गत नविन शिष्यवृत्ती व नूतनीकरणासाठी आलेल्या पात्र विद्यार्थ्याला खालील प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे घटक | रक्कम |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे/देण्यात येणारे शैक्षणिक शुल्क व ना-परतावा शुल्काची प्रतिपूर्ती | प्रत्यक्ष वार्षिक शुल्क किंवा रुपये २,००,००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. |
| ब | देखभाल /परिरक्षण भत्ता | रु. ३,०००/- प्रति महिना वसतिगृहामध्ये राहणा-या विद्यार्थ्यांना<br>रु. १,५००/- प्रति महिना डे-स्कॉलर विद्यार्थ्यांना |
| क | विशेष भत्ते ( दिव्यांगाच्या प्रकारानुसार त्या अनुषंगिक उदा.वाचन भत्ता, संरक्षण भत्ता, मदत भत्ता इ.) | रु. २,०००/- प्रति महिना |
| ड | पुस्तके व स्टेशनरी | रु. ५,०००/- प्रति वर्ष |
| इ | संगणक व त्याच्या संबंधित सुटे भाग खरेदीच्या खर्चाची प्रतिपूर्ती | एका व्यक्तीला पूर्ण अभ्यासक्रमांत एकदाच रु. ३०,०००/- देय. |
| ई | निवड झालेल्या उमेदवारांच्या विशिष्ट दिव्यांगासाठी आवश्यक असलेल्या सॉफ्टवेअरसह मदत व मदतीच्या साहित्याची खरेदीच्या खर्चाची प्रतिपूर्ती | एका व्यक्तीला पूर्ण अभ्यासक्रमांत एकदाच रु. ३०,०००/- देय. |

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येते.उपरोक्त योजनांची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाच्या ( संकेतस्थळ - www.disabilityaffairs.gov.in ) / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सदर योजनेच्या लाभासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) **व मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नुतनीकरणासाठी** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

## ६. प्रगती शिष्यवृत्ती योजना :-

[ AICTE-Pragati Scholarship Scheme For Girl Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **विद्यार्थिनीं** साठी प्रगती शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८ लाखापर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे. सन २०२०-२१ पासून सदर योजनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा संच निर्धारीत करण्यात आला आहे.

- शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) -

| राज्य | अ क्र. | **अभ्यासक्रम** | **संच संख्या** |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | ६२४ |
| | २ | पदवी | ५५३ |

- **शिष्यवृत्ती रक्कम** -

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु.५०,०००/- प्रति वर्ष |

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येते.

सदर योजनांची सविस्तर माहिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळ - www.aicte-india.org / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सदर योजनेच्या लाभासाठी चालू शैक्षणिक वर्षा मध्ये **प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षात** नव्याने **प्रवेशित** विद्यार्थिनींनी नवीन ( Fresh ) व **मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या** पात्र विद्यार्थिनींनी **नुतनीकरणासाठी** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

## ७. सक्षम शिष्यवृत्ती योजना :-

[AICTE-Saksham Scholarship Scheme For Specially - Abled Student (Degree / Diploma)]

मानव संसाधन मंत्रालय, भारत सरकार यांची अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्र तर्फे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका, पदवी) शिकणाऱ्या **विशेष सक्षम विद्यार्थ्यांसाठी** सक्षम शिष्यवृत्ती योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखा पर्यंत** व **दिव्यांगाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा अधिक** असावे असे निश्चित करण्यात आलेले आहे. सन २०२०-२१ पासून सदर योजनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शिष्यवृत्तीसाठी कोणतीही संच संख्या निर्धारीत नसून सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

- शिष्यवृत्तीचा नविन (Fresh) संच/कोटा (Quota) -

| राज्य | अ क्र. | **अभ्यासक्रम** | **संच संख्या** |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | सर्व पात्र |
| | २ | पदवी | सर्व पात्र |

- शिष्यवृत्ती रक्कम -

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम** (Lump sum Amount) |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु.५०,०००/- प्रति वर्ष |

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer (DBT) अंतर्गत जमा करण्यात येते.

सदर योजनांची सविस्तर माहिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळ - www.aicte-india.org / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal (NSP) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal (NSP) पोर्टलद्वारे (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सदर योजनेच्या लाभासाठी चालू शैक्षणिक वर्षा मध्ये **प्रथम वर्ष व थेट व्दितीय** वर्षात नव्याने **प्रवेशित** विद्यार्थ्यांनी **नवीन** (Fresh) **व मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नुतनीकरणासाठी** (Renewal) अर्ज NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

## ८. स्वनाथ शिष्यवृत्ती योजना :-

[ AICTE-Swanath Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्रेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोव्हिड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा** विद्यार्थ्यांसाठी स्वनाथ शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ पासून सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे सर्व स्त्रोतांमार्फत मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखापर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे. सदर योजनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा संच निर्धारीत करण्यात आला आहे.

- शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) -

| अ क्र. | **अभ्यासक्रम** | **संच संख्या** |
|---|---|---|
| १ | पदविका | १००० |
| २ | पदवी | १००० |

- शिष्यवृत्ती रक्कम -

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | एक रक्कम ( Lump sum Amount ) |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु.५०,०००/- प्रति वर्ष |

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजनांची सविस्तर माहिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळ - www.aicte-india.org / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सदर योजनेच्या लाभासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) **व मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या** पात्र विद्यार्थ्यांनी **नुतनीकरणासाठी** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

F/6

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे/संकेतस्थळ**

क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/संस्थापत्र/२०२२-२३/ ०१
दिनांक : ०३ /०१ / २०२३

प्रति,
सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक,
( अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था )
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांच्या मुदतवाढी बाबत....**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/२०२२-२३/२०७ दि.०५/०८/२०२२
२. या कार्यालयाचे पत्र क्र : १८/तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२२-२३/२११ दि.१२/०८/२०२२
३. या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/स्वनाथ-शिष्य/विकाप/२०२२-२३/२४८ दि.३०/०९/२०२२
४. केंद्र शासनाचे पत्र क्र. D-१२०११/०३/२०२२-DBT दि.३१/१०/२०२२
५. या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/२०२२-२३/२७६ दि.०३/११/२०२२
६. या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/२०२२-२३/३१५ दि.०५/१२/२०२२

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील ( NSP Portal संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) **प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती** योजनांची माहिती तसेच केंद्र शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या खालील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्याबाबत या कार्यालयाकडून संदर्भ क्र.१ च्या पत्राद्वारे सूचित करण्यात आलेले होते.

| विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे पूर्वीचे वेळापत्रक :: **शै.वर्ष २०२२-२३** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यवाही** | **अंतिम मुदत** |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ ऑक्टोबर,२०२२ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी ( मंजूर/नामंजूर ) करणे. | १५ नोव्हेंबर,२०२२ |

तसेच, संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या **प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती** योजनांच्या अंमलबजावणीसाठी देण्यात आलेल्या खालील **प्रथम मुदतवाढी** बाबत संदर्भ क्र.५ च्या पत्रान्वये या कार्यालयाकडून कळविण्यात आलेले होते.

| विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे सुधारित वेळापत्रक :: शै.वर्ष २०२२-२३ | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यवाही** | **अंतिम मुदत** |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३० नोव्हेंबर,२०२२ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी ( मंजूर/नामंजूर ) करणे. | १५ डिसेंबर,२०२२ |

तसेच, **द्वितीय मुदतवाढी** बाबत संदर्भ क्र.६ च्या पत्रान्वये या कार्यालयाकडून कळविण्यात आलेले होते.

| विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे सुधारित वेळापत्रक :: शै.वर्ष २०२२-२३ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कार्यवाही | अंतिम मुदत |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ डिसेंबर,२०२२ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी (मंजूर/नामंजूर) करणे. | १५ जानेवारी,२०२३ |

तरी आता, केंद्र शासनाच्या सोबत जोडलेल्या एनएसपी पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या **प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती** योजनांच्या अंमलबजावणीकरिता **खालीलप्रमाणे तिसऱ्यांदा मुदतवाढ** देण्यात आलेली आहे.

| विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे **सुधारित वेळापत्रक** :: शै.वर्ष २०२२-२३ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कार्यवाही | अंतिम मुदत |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | १७ जानेवारी,२०२३ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी (मंजूर/नामंजूर) करणे. | ३१ जानेवारी,२०२३ |

तरी सर्व संस्थांनी, सदर योजनेसाठी **तिसऱ्यांदा** देण्यात आलेल्या मुदतवाढीबाबतचे सुधारित वेळापत्रक संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावे व त्यांच्या संस्थेत शिकत असलेल्या सदर योजनेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठीच्या वाढीव मुदतीबाबत निदर्शनास आणून द्यावे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना सदर योजनेसाठी अर्ज करता येईल.

तसेच, सर्व संस्थांनी, उपरोक्त योजनेचे त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज, प्रलंबित न ठेवता सुधारित वेळापत्रकानुसार अंतिम मुदतीपूर्वी संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार (Guideline) तपासणी करुन (मंजूर / नामंजूर) निकाली काढावेत.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई.

**प्रत - यांना माहितीसाठी सविनय सादर.**

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई. (Email Id:- psec.higheredu@maharashtra.gov.in)
२. मा. सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई. (Email Id:- acs.mdd@maharashtra.gov.in ; desk६.mdd-mh@mah.gov.in)
३. मा. आयुक्त, समाज कल्याण विभाग आयुक्तालय, ३ चर्च पथ, पोलीस आयुक्त कार्यालयाजवळ, आगरकर नगर, पुणे -४११ ००१. (Email Id — comm.socwelfare@maharashtra.gov.in)
४. मा. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, आदिवासी विकास भवन, १ ला मजला, जुना आग्रा रोड, गडकरी चौक, नाशिक- ४२२ ००२. (Email Id :- ctd.nsk-mh@gov.in)
५. मा. संचालक, इतर मागास बहूजन कल्याण विभाग संचालनालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, ३ बी.जे. मेडिकल रोड, पुणे — ४११ ००१ (Email Id — dvjntobcsbcwpune@gmail.com)
६. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१. (Email Id :- schol.dhepune@gov.in)
७. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर (Email Id :- rooffice@dtemaharashtra.gov.in) यांना माहितीसाठी व सदर योजनांच्या अंमलबजावणीबाबत त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व त्यांच्या अधिनस्त अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संस्थांना सूचित करुन जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार कार्यवाही पूर्ण करुन घेण्यासाठी.

Home - National Scholarship Portal

scholarships.gov.in

Scheme Information

officer

### Notice Board - For Students

/ Department. The details of grievance redressal / nodal officers is available under "Officer's Information" section at "Officer's Corner"section on the portal.

For problems related to the portal's workflow, ie. functional or operational problems cropped up while operating NSP, Applicants and Institutes may contact NSP Helpdesk through email at helpdesk[at]nsp[dot]gov[dot]in or through phone at 0120 –

### Notice Board - For Institutes

Important Notice for Students/institutes/Nodal Officers on Pre Matric Scheme of Ministry of Minority Affairs - Click Here

The institutes, not having login credentials are advised to fill the KYC Registration Form and get it approved by District Nodal Officer (DNO) or State Nodal Officer (SNO). Option to apply for

### Notice Board - For Nodal Officers

Important Notice for Students/institutes/Nodal Officers on Pre Matric Scheme of Ministry of Minority Affairs - Click Here

The National Scholarships Portal has been launched for AY 2022-23. Students can apply for Scholarships(Fresh & Renewal) in

Central Schemes | UGC / AICTE Schemes | State Schemes

University Grants Commission - MHRD

All India Council For Technical Education-AICTE

| Scheme Name | Scheme Closing Date | Defective Application Verification Date | Institute Verification | DNO/SNO/MNO Verification | Guidelines/FAQ |
|---|---|---|---|---|---|
| PRAGATI SCHOLARSHIP SCHEME FOR GIRL STUDENTS ( TECHNICAL DEGREE) | Open till 17-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 2023-02-15 | Guidelines FAQ |
| PRAGATI SCHOLARSHIP SCHEME FOR GIRL STUDENTS ( TECHNICAL DIPLOMA) | Open till 17-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 2023-02-15 | Guidelines FAQ |
| SAKSHAM SCHOLARSHIP SCHEME FOR SPECIALLY ABLED STUDENT ( TECHNICAL DEGREE) | Open till 17-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 2023-02-15 | Guidelines FAQ |
| SAKSHAM SCHOLARSHIP SCHEME FOR SPECIALLY ABLED STUDENT ( TECHNICAL DIPLOMA) | Open till 17-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 2023-02-15 | Guidelines FAQ |
| AICTE – SWANATH SCHOLARSHIP SCHEME (TECHNICAL DIPLOMA) | Open till 17-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 2023-02-15 | Guidelines FAQ |
| AICTE – SWANATH SCHOLARSHIP SCHEME ( TECHNICAL DEGREE) | Open till 17-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 31-01-2023 | Open till 2023-02-15 | Guidelines FAQ |

Search

ENG IN 10:04 03-01-2023